**वाचा** :- 1) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरई 1098/(1945)/प्राशि-1 दि. 10 मार्च 2000
2) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरई 1098/(1945)/प्राशि-1 दि. मे 2001
3) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरई 1098/(1945)/प्राशि-1 दि. 9 जुलै व 12 जुलै 2001
4) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरई 1098/(1945)/प्राशि-1 दिनांक 27 मार्च 2002
5) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरई 1098/(1945)/प्राशि-1 दिनांक 21 ऑक्टोंबर 2002
6) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरई 1002/(89)/अंसक/ दिनांक 19 डिसेंबर 2002
7) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरई 2002/3395/प्राशि-1/ दिनांक 27 फेब्रुवारी 2003
8) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरई 2002/3395/प्राशि-1/ दिनांक 28 फेब्रुवारी 2003
9) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरई 2002/3291/प्राशि-1/ दिनांक 12 फेब्रुवारी 2004
10) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरई 2002/3395/प्राशि-1/ दिनांक 9 फेब्रुवारी 2005
11) शासन परिपत्रक क्रं.न्यायप्र-1008/7/प्र.क्र.58/08(भाग-2)/16 अ मंत्रालय मुंबई दिनांक 18 जुलै 2008
12) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरई 2006/(4767)/प्राशि-1 दिनांक 16 डिसेंबर 2009
13) वित्त विभाग शासन निर्णय अनियो 1005/126/सेवा-4/ दिनांक 31 ऑक्टोंबर 2005
14) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक सीईटी-2015/प्र.क्र.149/टीएनटी-1 दिनांक 23 जुन 2017
15) शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-5019/प्र.क.444/आस्था-8 दिनांक 23 जुलै 2015
16) पवित्र पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात दिनांक 27/2/2019
17) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक सीईटी-2015/प्र.क्र.149/टीएनटी-1 दिनांक 7 फेब्रुवारी 2019
18) प्रवित्र प्रणालीवर दिनांक 9/8/2019 रोजी प्राप्त झालेली शिफारस पात्र उमेदवारांची यादी.
19) मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), म.रा., पुणे यांचे पत्र क्रं.पवित्र/पदभरती/कागदपत्र पडताळणी/306/5309 दिनांक 9/8/2019
20) शिफारस प्राप्त उमेदवारांची कागदपत्र पडताळणी दिनांक 13 ऑगस्ट ते 26 ऑगस्ट 2019
21) मा. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रं.आस्था अ/टेबल क्रं.106/प्राथ./17237/2019/5143 दिनांक 27/8/2019
22) मा. उपसचिव, ग्राम विकास विभाग यांचे पत्र क्रं.जिपब-4819/प्र.क्र.717/आस्था 14 दिनांक 28/8/2019
23) मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे दाखल याचिका क्रं.4079/2019
24) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे पत्र क्रं. न्यायाप्र-2019/प्र.क्र.261/टीएनटी-1/ दिनांक 4/9/2019

-----------------------------------------ooooooooooooooo----------------------------- कात 1949। 2019

जा.क्र.जिपऔ/शिक्षण/प्रावि-2/2019-20
कार्यालय जिल्हा परिषद, औरंगाबाद
दिनांक 09 /09/2019

## आदेश

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये मुलाखतीशिवाय विकल्प दिलेल्या उमेदवारांची निवड यादी पवित्र प्रणालीवर संदर्भ क्रं. 18 अन्वये प्राप्त झालेली आहे. सदर यादीतील उमेदवारांची कागदपत्र पडताणी दिनांक 13/8/2019 ते 26-08-2019 या कालावधीत करण्यात आलेली आहे. कागदपत्र पडताळणीनुसार खालील नमूद उमेदवारांची औरंगाबाद जिल्हा परिषद अंतर्गत नियुक्तीपत्र खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे

Scanned by CamScanner

## Primary (Urdu Medium) Graduate Teacher std(6-8)

| Sr. No. | Applicants Name | Post | Subject Type - Subject | Caste Category | Recommended Caste-Horizontal Categ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | DNYANESHWAR AKNATH SIRSATH (SED_TAIT_0024318 ) | GT std(6-8) | Language - English | NT D | NT D - Not Applicable |

**अटी व शर्ती**

1) शिक्षण सेवक म्हणून आपल्या पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. आपणास पदस्थापना देण्यात आलेल्या शाळेवर तात्काळ रुजू व्हावे लागेल.
2) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्रं. 4079/2019 मधील निर्णयाच्या व मा. उच्च न्यायालयातील शिक्षक पद भरतीशी संबधीत अन्य प्रलंबीत असलेल्या याचिकेतील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून आपणास नियुक्तीपत्र देण्यात येत आहे.
3) आपली शिक्षक सेवक म्हणून केलेली नियुक्ती ही पदस्थापना आदेशानंतर रुजू झालेल्या तारखेपासून 3 वर्षापर्यंत वैध राहील.
4) आपण शिक्षण सेवक पदावर तीन वर्षे समाधानकारक काम केल्यानंतरच प्राथमिक शिक्षकाच्या नियमित पदावर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यास पात्र समजण्यात येईल.
5) शिक्षण सेवक म्हणून आपणास जिल्हयांतील कोणत्याही प्राथमिक शाळेत काम करावे लागेल.
6) नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तणुक केल्यास आपली नियुक्ती रदद करण्यात येईल.
7) सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह योजना यांच्या तरतूदी, शासन जिल्हा परिषद सेवेत असलेल्या दि. 9 नोव्हेंबर 2005 रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागू होणार नाही. आपणास परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. त्याचप्रमाणे पदस्थापना आदेश निर्गमित झालेनंतर संबधित कार्यालय प्रमुख यांनी कार्यवाही करावी व तसे प्रतिज्ञापत्र संबधित उमेदवाराकडून घेण्यात यावे.
8) आपणास पदस्थापना आदेश निर्गमित झालेनंतर वैद्यकीय मंडळाकडून एक महिन्याच्या आत वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी लागेल, वैद्यकीय मंडळाकडून, शारिरीक व मानसिकदृष्टया पात्र असल्याचे प्रमाणित झालेनंतर शिक्षण सेवक पदाससाठी ग्राहय धरण्यात येईल.
9) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 12 डिसेंबर 2011 मधील तरतुदीनुसार उमेदवाराने नियुक्ती दिनांकापासून 6 महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील.
10) मागासवर्गीय उमेदवारांचे बाबतीत जातीचे प्रमाणपत्राची पडताळणी सक्षम प्राधिकरणाकडून करुन घेण्याची व जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) सादर करणे अनिवार्य व बंधनकारक राहील.
11) पवित्र पोर्टलवरील स्वप्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली माहिती व आपण सादर केलेली कागदपत्रे भविष्यात केंव्हाही खोटी अगर बनावट आढळून आल्यास आपणांस कोणतीही पूर्वसूचना न देता आपली नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.
12) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयाकडून आपले डी.एड. चे गुणपत्रक व प्रमाणपत्र, टीईटी प्रमाणपत्र यांची पडताळणी करुन ते वैध असल्याबाबतचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच आपली नियुक्ती पुढे चालू राहील, अन्यथा आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

Scanned by CamScanner

13) आपणास या औरंगाबाद जिल्हा परिषदेची सेवा सोडावयाची असल्यास त्याबाबत एक महिन्याचे आधी पुर्वसूचना देणे बंधनकारक राहील, तशी आगावू सूचना न दिल्यास एक महिन्याचे वेतन वसूल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील.

14) आपली नियुक्ती ही आपण सादर केलेल्या कागदपत्रावरुन करण्यात आलेली असून त्याच्या मुळ प्रमाणपत्राची सत्यता त्या-त्या प्रमाणपत्र वितरण करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून करण्यात येईल. यामध्ये विसंगती आढळून आल्यास आपली नियुक्ती एकतर्फी रद्द करण्यात येईल.

- स्वाक्षरीत /-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, औरंगाबाद**

**प्रत, माहितीस्तव सविनय सादर.**

1) मा. आयुक्त शिक्षण, म.रा., पुणे.
2) मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), म.रा., पुणे.
3) मा. उपसचिव, ग्राम विकास विभाग मर्झबान पथ बांधकाम भवन, मुंबई.

**प्रत अंमलबजावणीस्तव- संबधीतास.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, औरंगाबाद**

Scanned by CamScanner